


मराठी साप्ताहिक

# युवा सुत्र

MAHMAR/2023/84104

◗ Year 03 ● Issue 27 ● Thane ● Tuesday 30 September to 06 October 2025 ● Price Rs.05 ● Page :04

● वर्ष: ०३ ● अंक: २७ ● ठाणे ● दिनांक: मंगळवार ३० सप्टेंबर ते सोमवार ०६ ऑक्टोबर २०२५ ● मूल्य: ५ रु. ● पेज: ०४ ● संपादक: युवराज डी. सुर्वे




## हाऊसिंग सोसायट्यांच्या स्वयं-समूह पुनर्विकासासाठी स्वतंत्र प्राधिकरण

▸▸ युवा सुत्र

**मुंबई :** मुंबईसह राज्यातील नोंदणीकृत गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या स्वयंपुनर्विकासाला आणि समूह पुनर्विकासाला चालना देण्यासाठी 'स्वयं-समूह पुनर्विकास प्राधिकरण' स्थापन करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला असून, या प्राधिकरणाचे पहिले अध्यक्ष म्हणून विधान परिषदेतील भाजपचे गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना कॅबिनेट मंत्रिपदाचा दर्जा असेल. राज्यातील नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या इमारतींचा स्वयंपुनर्विकास करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहन आणि सवलती देण्याबरोबरच सप्टेंबर 2019 च्या शासन निर्णयातील विविध मुद्द्यांची अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्याकरिता महायुती सरकारने 24 एप्रिल 2025 रोजी आमदार प्रवीण दरेकर यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट नेमला होता. या अभ्यासगटाने अडीच महिन्यांनंतर 14 जुलै रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अहवाल सादर केला होता. या अभ्यासगटाने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी आता स्वयं-समूह पुनर्विकास प्राधिकरण स्थापन केले आहे. मुंबईसह राज्यभरातील जुन्या इमारतींचा पुनर्विकास गतिमान करण्यासाठी हे प्राधिकरण महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. स्वयंपुनर्विकास आणि समूह पुनर्विकास करण्यासाठी हे प्राधिकरण असल्याने कोणत्याही बिल्डरकडे न जाता अशा पुनर्विकासासाठी रहिवाशांना अर्थसहाय्य मिळणे या प्राधिकरणामुळे सुलभ होईल आणि बिल्डर देतो त्यापेक्षा मोठे घर,तेही कमी पैशांत रहिवाशांना मिळेल. याचा उत्तम दाखला प्रवीण दरेकर यांच्या पुढाकाराने मुंबईत सुरू झालेल्या स्वयंपुनर्विकास योजनेत पुढे आला आहे. राज्य सरकारने या योजनेला राजाश्रय दिल्यामुळे ही योजना मुंबईत गतिमान झाली. मुंबई जिल्हा बँकेकडे स्वयंपुनर्विकास योजनेसाठी आजपर्यंत 1600 प्रस्ताव आले असून, त्यापैकी 40-45 संस्थांना कर्ज देण्यात आले आणि 18 इमारती मुंबईत स्वयंपुनर्विकासातून उभ्यादेखील राहिल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वयं-समूह पुनर्विकास प्राधिकरण स्थापन करून त्याचे अध्यक्षपद या योजनेचे प्रवर्तक प्रवीण दरेकरांकडेच दिल्याने आता स्वयंपुनर्विकास योजनेची चळवळ राज्यव्यापी होऊ घातली आहे.



- **प्रवीण दरेकर यांना प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी नेमताना त्यांना कॅबिनेट मंत्रिपदाचाही दर्जा देण्यात आला आहे.**
- **मंत्रिपदाच्या दर्जानुसार प्रवीण दरेकर यांना सर्व भत्ते व सुविधा मिळणार असून त्याची जबाबदारी म्हाडा प्राधिकरणाकडे सोपविण्यात आली आहे.**
- **स्वयं-समूह पुनर्विकास प्राधिकरणाची नोडल एजन्सी म्हणून म्हाडा काम पाहणार आहे.**
- **प्राधिकरणाच्या कामकाजासाठी आवश्यक कार्यालयीन जागा व कर्मचारी वर्गाची नेमणूक, त्यांच्या भत्त्याची तरतूद देखील म्हाडा करणार आहे.**
- **मुंबईसह राज्यभरातील स्वयंपुनर्विकासाचे सर्व निर्णय यापुढे हे स्वयं-समूह पुनर्विकास प्राधिकरण घेईल.**

## भाजपा पदाधिकाऱ्याची पत्नीसह 3 ठिकाणी मतदारयादीत नावे, एका दुकानावर 25 नावे

### काँग्रेसचा आरोप

■ युवा सुत्र

**मीरारोड:** विधानसभा निवडणुकीवेळी मतदारयादीत मोठ्या प्रमाणात घोटाळे करून बोगस मतदानासह वोटचोरी झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवडून आलेल्या भाजपा आमदाराच्या जवळच्या पदाधिकाऱ्याने सहकुटुंब मीरा भाईंदरमध्ये तीन ठिकाणी मतदार यादीत नावे असल्याचे काँग्रेसच्या वतीने पत्रकार परिषदेत सांगण्यात आले. इतकेच नव्हे तर मीरारोडमधील एका दुकानाच्या पत्त्यावर तब्बल २५ मतदारांची नोंद केली गेल्याचेही सांगण्यात आले.



काँग्रेस नेते मुझफ्फर हुसेन सह जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत, आफरीन सय्यद, प्रकाश नागणे, ॲड. राहुल राय, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष सिद्धेश राणे, दीपक बागरी, जय ठाकूर आदींनी सोमवारी सायंकाळी मीरारोड येथे पत्रकार परिषद घेतली. यावेळी विधानसभा निवडणुकी आधी मीरा भाईंदर शहरातील १४५ आणि १४६ मतदार संघातील ९० हजार मतांची गडबडी असल्याची तक्रार काँग्रेसने गेल्या वर्षी दिली होती. त्याचे उत्तर आयोगा कडून आता मिळाले असून त्यात आहे मीरा भाईंदर १४५ विधानसभा मतदारसंघात ५३ हजार ५४८ मतांची वाढ झाल्याचे तसेच ४,९१३ मतदार वगळले असल्याचे कळवले आहे. बोगस मतदार नोंदणी, प्रत्यक्ष रहात असलेल्या मतदारांची खात्री न करताच चुकीच्या व दुबार नावांची नोंद, मानमर्जीने अनेकांची नावे परस्पर काढून टाकणे आदी अनेक आरोप यावेळी पत्रकार परिषदेत निवडणूक आयोगावर केले गेले. आयोगा कडे उत्तर मागितले असता भाजपा आमदार उत्तर देतात या बद्दल हुसेन यांनी आश्चर्य व्यक्त केले. आम्ही आयोगाला विचारणा केली असता भाजपाचे लोक फुकटची प्रवक्तेगिरी कशाला करतात असा टोला त्यांनी लगावला.

## बारावी परीक्षेची ऑनलाईन आवेदन पत्रे भरण्यास 20 ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ; विद्यार्थ्यांना शासनाचा दिलासा

■ युवा सुत्र

मुंबई : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या बारावीच्या फेब्रु-मार्च २०२६ च्या परीक्षेसाठी नियमित विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे भरावयाच्या तारखेस (नियमित शुल्क) २० ऑक्टोबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे विद्यार्थ्यांना मुदतीत अर्ज भरण्यास अडचण निर्माण होऊ शकते, या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी विद्यार्थ्यांना दिलासा देण्याबाबत शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना निर्देश दिले होते. त्यानुसार मंत्री दादाजी भुसे यांनी राज्य मंडळास केलेल्या सूचनेनुसार मंडळाने हा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या बारावीच्या फेब्रु-मार्च २०२६ च्या परीक्षेसाठी नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे UDISE + मधील PEN-ID वरून ऑनलाईन पद्धतीने त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत भरावयाची आहेत. व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे नियमित विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परिक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खासगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, आयटीआय (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) चे विषय घेऊन परिक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत प्रचलित पद्धतीने भरावयाची आहेत. सदरची आवेदनपत्रे www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरुन भरावयाच्या तारखेस (नियमित शुल्क) २० ऑक्टोबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे फेब्रु-मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या दहावी व बारावी परीक्षेसाठी खासगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) स्वीकारण्याच्या तारखांना देखील १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

**नवीन परीक्षा केंद्र मान्यतेचे प्रस्ताव स्वीकारण्यास १० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ:** फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या दहावी व बारावी परीक्षेसाठी नवीन परीक्षा केंद्र मान्यतेचे प्रस्ताव ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत स्वीकारण्यात यावेत, असे कळविण्यात आले होते. सदर नवीन परीक्षा केंद्रासंदर्भातील मान्यतेचे प्रस्ताव स्वीकारण्यास मुदतवाढ देण्यात येत असून असे प्रस्ताव १० ऑक्टोबर २०२५ पर्यंत स्वीकारण्यात यावेत, असे मंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

## सामाजिक, राजकीय आंदोलनातील ७७ खटले मागे घेण्याचा मंत्रिमंडळ उपसमितीचा निर्णय!

▸▸ युवा सुत्र

मुंबई: राज्यातील धार्मिक, राजकीय आणि सामाजिक आंदोलनांदरम्यान दाखल झालेले ७७ खटले मागे घेण्याचा निर्णय मंत्रिमंडळ उपसमितीने घेतला असून तशी शिफारस सरकारला करण्यात आल्याची माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी सोमवारी दिली. राज्यातील राजकीय आणि सामाजिक आंदोलनांदरम्यान दाखल करण्यात आलेले खटले मागे घेण्याबाबत शेलार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे. या समितीच्या बैठकीत पोलिसांकडे दाखल करण्यात आलेल्या २०१ अर्जदारापैकी ७७ अर्जदारांवरील खटले मागे घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला. या बैठकीस विधि व न्याय विभागाचे प्रधान सचिव उदय शुक्ला, अभियोग संचालनालयाचे संचालक अशोक भिल्लारे, गृह विभागाचे उपसचिव चेतन निकम तसेच राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. स्त्रीविषयक गुन्हे, गंभीर स्वरूपाचे खटले, वैयक्तिक व दिवाणी प्रकरणे ही शासनाच्या धोरणांतर्गत माफ केली जाऊ शकत नाहीत. त्यामुळे अशा प्रकरणावरील खटले मागे घेण्यास स्पष्ट नकार देण्यात आला असल्याचे शेलार यांनी सांगितले. तसेच, आमदार, माजी आमदार, खासदार व माजी खासदार यांच्याशी संबंधित सहा प्रकरणांबाबत, शासन निर्णय व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, मुंबई उच्च न्यायालयातच अंतिम निर्णय घ्यावा लागेल. त्या दिशेनेही पावले उचलण्यात येत असल्याचेही शेलार यांनी सांगितले. मंत्रिमंडळ उपसमितीकडे प्राप्त २०१ अर्जदारापैकी ७७ अर्जावर पुन्हा विचार करण्याची शिफारस करण्यात आली असून ही प्रकरणे पोलीस उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त क्षेत्रीय समितीपुढे ठेवण्यात येतील, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, आंदोलक, विचारधारात्मक चळवळींतील सहभागी यांच्यावर विनाकारण खटले दाखल करण्यात आले होते. अशा अनावश्यक खटल्यांपासून त्यांची मुक्तता करणे, हे सरकारचे उत्तरदायित्व असल्याचे शेलार यांनी सांगितले. तसेच गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दहीहंडी, करोना काळातील सामाजिक कार्यक्रम, कामगार आंदोलन अशा विविध पार्श्वभूमीवर झालेले खटले नवीन अर्जांच्या आधारे पुनर्विचारासाठी खुले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या संदर्भात लवकरच पुन्हा बैठक घेण्यात येणार आहे. त्याआधी सर्व गणेशोत्सव मंडळे, नवरात्रोत्सव मंडळे, सामाजिक संस्था, युनियन प्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी सरकारकडे अर्ज सादर करावेत, असे आवाहनही शेलार यांनी केले.

## संपादकीय

### पावसाचे रौद्ररूप आणि महाराष्ट्र

गेल्या आठवड्याभरात महाराष्ट्रात जो पाऊस कोसळला. त्या पावसात अनेक ठिकाणी शेतातली माती भरलेल्या पिकासह वाहून गेली. शेतकऱ्यांच्या हाता, तोंडाशी आलेले पिक पावसाने नेले त्याच बरोबर गावागावात पाण्याचा महापूर लोटला. नदीकाठची गावे अक्षरशः जलमय झाली, जणू गावाने जलसमाधी घेतली असावी. इतका भयंकर पूर आलेला होता. अजूनही अनेक तालुके, गावे पाण्याखाली आहेत. शेत जमिनी बरोबर घरादारातील आयुष्यभर जमवलेल्या जीवनावश्यक वस्तू, फर्निचर सर्वकाही या पावसात वाहून गेले. तेल गेले, तूप गेले, हाती धुपाटणे राहिले! अशी अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे. गुरे ढोरे, मुले बाळे, वृक्ष पिके पुराच्या पाण्यात वाहून जाताना शेतकऱ्यांनी पाहिली. नऊ महिने पोटात जपलेल्या मुलाला वाहून जाताना पाहिल्यावर एका आईची अवस्था कशी होते, हे सुद्धा ह्या पावसाने दाखवले. इतका विचित्र पाऊस बरसला. इतरवेळी हवाहवासा वाटणारा पाऊस आता शेतकरी मायबापांना नकोसा वाटू लागला आहे. आता कर्ज कसे फेडणार, वाहून गेलेल्या वस्तू, फर्निचर, मुलांची वह्या, पुस्तके, कपडे, कागदपत्रे हे पुन्हा कसे मिळवायचे, कमवायचे हा गंभीर प्रश्न आता शेतकऱ्यांच्या डोळ्यासमोर उभा आहे. त्यात पडलेले घर पुन्हा कसे बांधायचे, उभारायचे? या विचाराने शेतकरी बांधव आपले उर, डोके बडवत आहेत. त्यांच्या बायका भर पावसात ढगफुटी झाल्याप्रमाणे आसवे गाळीत आहेत. अशी अवघड परिस्थिती आज महाराष्ट्राची आहे. दरम्यान, या पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आता सत्ताधारी, विरोधी असे दोन्हीकडची नेते मंडळी मराठवाड्यात येत आहेत. परंतु अनेक ठिकाणी या नेते मंडळींना विरोध होताना दिसत आहे. कारण शेतकऱ्यांच्या मते आम्हाला मदत हवी, पाहणी करून काहीच होणार नाही. गरज आहे ती तातडीने मदतीची. कोणताही पंचनामा न करता तात्काळ मदत करा, ओला दुष्काळ जाहीर करा असे बहुतांश शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. खरंतर इतक्या मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यानंतर राज्य सरकारने देखील शेतकऱ्यांना थोडा बहुत दिलासा मिळेल याद्रृष्टीने थोडीतरी मदत आता करायला हवी. पण असे होताना दिसत नाहीये. यावर्षी इतका प्रलयंकारी पाऊस पडला आहे कि, पुढे जाऊन राज्य सरकार शेतकऱ्यांना मदत करेलही पण इतक्या मोठ्या प्रमाणात पाऊस का पडला? सप्टेंबर महिना संपत आला तरीही पाऊस कमी होण्याचे नाव का घेत नाहीये? यावर देखील चर्चा आणि संशोधन होणे गरजेचे आहे. पाऊस तर हवा पण इतकाही नको कि मायबाप शेतकरी पार देशोधडीला लागेल. त्यामुळे अशा पडणाऱ्या पावसावर अभ्यास होणे गरजेचे आहे. पूर्वी हिमालय क्षेत्रात असा ढगफुटीचा पाऊस पडत होता आजही पडतो परंतु महाराष्ट्र राज्यातही आता ढगफुटी सदृश्य पाऊस पडू लागला आहे. हे सर्व हवामानाच्या बदलामुळे तर घडत नाही ना? याचा शोध घेणे गरजेचे आहे. या पावसामुळे शेतातली माती पूर्णपणे वाहून गेली आहे. जमिनीची धूप कशी होते, हे आपण आज प्रत्यक्षात पाहत आहोत. पुढच्या काही वर्षात पूरग्रस्त भूमीवर पीक येईल कि नाही याची शाश्वती देता येत नाही. दरम्यान, सर्वांनी पर्यावरण विषयावर एकत्र येण्याची गरज आहे. राजकारणाच्या पलीकडे जाऊन, आपल्याला मानवी भवितव्याकरता काय करता येईल याचा विचार सत्ताधारी, विरोधी पक्ष आणि जनतेने करणे गरजेचे आहे.

– युवराज डी. सुर्ले, संपादक

## शहापूर, मुरबाड, भिवंडीसह ३१ एसटी आगार व्यवस्थापकांवर कारवाई होणार

युवा सूत्र

मुंबई : राज्यात अतिवृष्टीमुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा आपत्तीच्या काळात एसटीच्या आगारातील आगार व्यवस्थापक कर्तव्यावर हजर नव्हते. एसटी महामंडळाच्या २५१ पैकी ३४ आगारांतील गैरहजर असलेल्या आगार व्यवस्थापकांवर कारवाई करण्यात येणार आहे. एसटीच्या ठाणे, पालघर, रत्नागिरी, सातारा, सांगली, सोलापूर, नाशिक, जळगाव, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, जालना, लातूर, परभणी, भंडारा, वर्धा या विभागांतील आगारामधील आगार व्यवस्थापक मुख्यालयात नसल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या काही दिवसापासून राज्यभरात परतीच्या पावसाने थैमान घातले आहे. विशेषतः मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाल्याने अनेक रस्ते बंद आहेत. पुलावर पाणी आले आहे. अशा परिस्थितीमध्ये एसटीची वाहतूक अनेक ठिकाणी ठप्प झाली. अनेक प्रवासी बसस्थानकावर अडकून पडले. अशा गंभीर परिस्थितीमध्ये मुख्यालयात हजर राहून जबाबदारीने कर्तव्य पार पाडण्याऐवजी काही आगार व्यवस्थापक कर्तव्यावर गैरहजर असल्याचे दिसून आले आहे. या आगार व्यवस्थापकांनी परिस्थितीचे गांभीर्य न ओळखता अत्यंत बेजबाबदार वर्तन केले आहे. अशाप्रकारे कर्तव्यात कसूर करणाऱ्या आगार व्यवस्थापकांना संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक यांनी कारणे दाखवा नोटीस तातडीने बजावली पाहिजे. त्यामध्ये त्यांचा खुलासा समाधानकारक नसल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. तसेच हे आगार व्यवस्थापक ज्या विभाग नियंत्रकांच्या अखत्यारित काम करतात, त्या विभाग नियंत्रकांना देखील याबाबत विचारणा केली जाईल, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. आगार व्यवस्थापक हा एसटी प्रशासनाचा मुख्य घटक आहे. त्याच्या अंतर्गत शेकडो कर्मचारी काम करत असतात. आगार व्यवस्थापक ज्या आगारात कार्यरत असतो, तेथे अनेक बस रात्रपाळीला मुक्कामी असतात. तसेच, लाखो रुपये किमतीचे ऑइल, इंधन व इतर सुटे भाग तिथे असतात. याबरोबरच तिकीट विक्रीमधून आलेली मोठी रक्कम आगारात ठेवण्यात आलेली असते. अशा परिस्थितीमध्ये एक पालक म्हणून आगार व्यवस्थापकावर मोठी जबाबदारी असते. त्याने आगारात दररोज उपस्थित राहून या सर्वांना मार्गदर्शन करणे आवश्यक असते. परंतु काही आगारप्रमुख हे आगारात उपस्थित नसल्याचे सुरक्षा व दक्षता खात्याच्या गोपनीय अहवालात स्पष्ट झाले. कर्तव्यात कसूर करून बेजबाबदार वर्तन करणाऱ्या अशा आगार व्यवस्थापकांवर प्रशासन लवकरच कारवाई करेल, यापुढे अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत याची दक्षता एसटी महामंडळाने घ्यावी, असे निर्देश प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.



## डोंबिवली ठाकुरवाडीतील बेकायदा साईतीर्थ आर्केड भुईसपाट करण्याचे आदेश; बांधकामधारक भूमाफियांवर फौजदारी गुन्हा

युवा सूत्र

डोंबिवली – डोंबिवली पश्चिमेतील ठाकुरवाडी भागातील समर्थ जलाराम ज्योत या अधिकृत इमारतीच्या बाजुला कल्याण डोंबिवली पालिकेच्या बांधकाम परवानग्या न घेता बनावट कागदपत्रांच्या आधारे तीन भूमाफियांनी जमीन मालकाच्या संगनमताने तीन वर्षापूर्वी साईतीर्थ आर्केड ही बेकायदा इमारत उभारली. या बेकायदा इमारत प्रकरणी तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पालिकेने ही इमारत अनधिकृत घोषित करून भूमाफियांना ही बेकायदा इमारत स्वताहून भुईसपाट करण्याचे आदेश दिले होते.



तरीही भूमाफियांनी या पाच माळ्याच्या बेकायदा इमारतीची उभारणी केली म्हणून पालिकेच्या ह प्रभागाचे प्रभारी अधीक्षक अर्जुन वाघमारे यांनी विष्णुनगर पोलीस ठाण्यात शुक्रवारी 'एमआरटीपी'चा गुन्हा दाखल केला आहे. पालिकेच्या ह प्रभागातील अधीक्षक अरूण पाटील हे वैद्यकीय रजेवर आहेत. त्यामुळे लिपिक अर्जुन वाघमारे यांनी साहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांच्या सूचनेवरून ही तक्रार विष्णुनगर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. पोलिसांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगररचना अधिनियमाने (एमआरटीपी) गुन्हा दाखल करून घेतला आहे. या गुन्ह्यात भूमाफिया प्रमोद रमेश भोईर, भूषण रमेश भोईर आणि लोकेश श्रीनिवास गावडा यांना आरोपी करण्यात आले आहे. माहिती कार्यकर्ते विनोद जोशी गेल्या दोन वर्षापासून साईतीर्थ आर्केड या बेकायदा इमारतीवर कारवाई करावी या मागणीसाठी पालिका, शासनस्तरावर प्रयत्नशील आहेत. याचिकाकर्ते हरेष म्हात्रे यांच्या डोंबिवली पश्चिमेतील १४ बेकायदा इमारत प्रकरणात या इमारतीचा समावेश आहे.

ह प्रभागाचे प्रभारी अधीक्षक अर्जुन वाघमारे यांनी तक्रारीत म्हटले आहे, बांधकामधारक सिताबाई भोईर यांच्या पुढाकाराने भूमाफिया प्रमोद रमेश भोईर, भूषण रमेश भोईर आणि लोकेश श्रीनिवास गावडा यांनी डोंबिवली पश्चिमेतील ठाकुरवाडी भागात अधिकृत समर्थ जलाराम ज्योत इमारतीच्या बाजुला एक बेकायदा इमारत उभारली आहे, अशी तक्रार ह प्रभागात प्राप्त झाली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने साहाय्यक आयुक्तांनी या इमारतींच्या बांधकामधारकांना इमारतीची अधिकृतता सिध्द करणारी आवश्यक कागदपत्रे २४ तासाच्या आत सादर करण्याची नोटीस बजावली होती. बांधकामधारक सुनावणीला हजर राहिले नाहीत. बांधकामधारकांनी साईतीर्थ आर्केड बेकायदा इमारतीची कागदपत्रे सुनावणीच्यावेळी दाखल केली नाहीत आणि स्वताही सुनावणीला हजर राहिले नाहीत म्हणून ह प्रभागाचे सहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांनी साईतीर्थ आर्केड इमारत अनधिकृत घोषित केली. या आदेशानंतर बांधकामधारकांनी येत्या आठ दिवसात साईतीर्थ इमारत भुईसपाट करून घेण्याचे आदेश दिले.

बांधकामधारकांनी दिलेल्या अवधीत बेकायदा इमारत स्वताहून तोडून घेतली नाही. पालिकेच्या परवानग्या न घेता बेकायदा इमारतीची उभारणी केली म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना आणि नियोजन (एमआरटीपी) कायद्याने बांधकामधारकांविरुध्द तक्रार करण्यात येत आहे, असे तक्रारीत म्हटले आहे. कुंभारखाणपाडा येथील साई रेसिडेन्सी बेकायदा इमारत भुईसपाट करण्याची कार्यवाही सुरू असतानाच आता साईतीर्थ आर्केड इमारत पालिकेच्या रडारवर आली आहे.

## डोंबिवलीत नाल्यात पडून स्वामी विवेकानंद शाळेतील विद्यार्थ्याचा मृत्यू

युवा सूत्र

डोंबिवली – डोंबिवली पश्चिमेतील ह प्रभाग क्षेत्रातील देवीचापाडा परिसरातील जगदांबा माता परिसरातून भरत भोईर नाला वाहतो. या नाल्यावर चेंबरचे झाकण नव्हते. मुसळधार पावसामुळे नाला दुथडी वाहत होता. रविवारी रात्री साडे दहा वाजता मुलांसोबत खेळत असताना जगदांबा परिसरातील एक १३ वर्षाचा शाळकरी मुलगा नाल्यावरील उघड्या झाकण्याच्या छिद्रातून नाल्यात पडून वाहून गेला. स्थानिक रहिवासी आणि कल्याण डोंबिवली पालिका अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक प्रयत्न करून या बेपत्ता मुलाला रात्रीच नाल्यातून बाहेर काढले. त्याला तातडीने पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात नेण्यात आले. तेथे त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले.

## लोकलमधून पडून महिलेचा मृत्यू; भाईंदर स्थानकाजवळील घटना

युवा सूत्र

वसईः पश्चिम रेल्वेवरील भाईंदर खाडी पुलाजवळ लोकलमधून पडून एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सोमवारी दुपारी अडीच वाजताच्या सुमारास घडली आहे. विमल सुपेवार (५३) असे या मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. दररोज पश्चिम रेल्वेने विरार ते चर्चगेट असा प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत गेल्या काही काळात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. लोकलच्या वेळेतील अनियमितता, सकाळ आणि संध्याकाळच्या वेळेत असणारी गर्दी यामुळे नागरिकांवर लोकलच्या दारात लटकून, धोकादायक प्रवास करण्याची वेळ अनेकदा ओढवते. तसेच विरार चर्चगेट रेल्वे मार्गावर यामुळे लोकलमधून पडून अनेक प्रवासी जखमी झाल्याच्या, तर काही जण मृत्युमुखी पडल्याच्या घटना सातत्याने घडताना दिसतात.

## विभक्त पत्नीचा नांदण्यास नकार...पतीने उशीने तोंड दाबून केली हत्या

■ युवा सुत्र

मुंबई : पवईत राहणाऱ्या एका ५६ वर्षीय महिलेची हत्या करण्यात आली असून या प्रकरणी पवई पोलिसांनी महिलेच्या पतीला अटक केली. सावित्रीदेवी चंद्रभान असे या महिलेचे नाव असून ती पतीसोबत राहात नव्हती. पुन्हा एकत्र राहण्यासाठी पती तिचे मन वळवत होता. मात्र तिने नकार दिल्याने रविवारी संतापलेल्या पतीने उशीने तोंड दाबून तिची हत्या केली. सावित्री देवी चंद्रभान (५६) ही महिला वकील आहे. ती पवईच्या रहेजा संकुल परिसरात एकटी रहात होती. ती रविवारी दुपारी आपल्या घरात बेशुद्धावस्थेत आढळली. स्थानिक रहिवाशांनी या संदर्भात मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी तिला रुग्णालायत दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. श्वास गुदरमल्यामुळे तिचा मृत्यू झाला होता. त्यामुळे यामागे घातपाताचा संशय पोलिसांना आला आणि त्यादृष्टीने पोलिसांनी तपास सुरू केला.

**संशीयत पतीला अटकः** हत्या झाली तेव्हा सावित्री घरात एकटी होती. ती पतीपासून वेगळी रहात होती. पोलिसांनी तिचा पती राजीवकडे चौकशी केली. सुरुवातीला त्याने या प्रकरणाशी आपला काहीच संबंध नसल्याचे सांगितले. मात्र पोलिसांनी केलेल्या सखोल चौकशीत त्याने हत्येची कबुली दिली. राजीव चंद्रभानविरोधात पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.

**एकत्र राहण्यास दिला नकारः** सावित्री देवी चंद्रभान पतीसोबत पवईच्या रहेजा विहार परिसरात रहात होती. तिचा पती राजीव दोन वर्षापूर्वी खासगी विमान कंपनीतून निवृत्त झाला होता. त्यांच्यात पूर्वीपासून कौटुंबिक वाद सुरू होते. त्यामुळे मागील एक वर्षांपासून ते वेगळे राहू लागले होते. राजीव मरोळ येथे, तर सावित्री पवईला रहात होती. दरम्यान, राजीवने पुन्हा एकत्र येण्याचा निर्णय घेतला आणि तो सावित्रीचे मन वळविण्याचा प्रयत्न करीत होता. तो रविवारी दुपारी सावित्रीला भेटण्यासाठी तिच्या घरी आला होता. यावेळी त्याने पुन्हा सावित्रीला एकत्र राहण्याबाबत विचारले. मात्र सावित्रीने नकार दिला. या मुद्द्यावरून त्यांच्यात पुन्हा वाद झाला. रागाच्या भरात राजीवने उशीने तिचे तोंड दाबले. श्वास गुदमरून तिचा मृत्यू झाला. आरोपी राजीवला न्यायालयात हजर केले असता त्याची पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. पवई पोलीस या प्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

## ऑर्थर रोड जेलमध्ये कैद्यांमध्ये जोरदार राडा, भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या जेल अधिकाऱ्यावरही हल्ला

■ युवा सुत्र

मुंबईः मुंबईतील महत्त्वाचे मध्यवर्ती तुरुंग असणाऱ्या ऑर्थर रोड जेलमध्ये कैद्यांमध्ये राडा झाला. क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादातून आर्थर रोड जेलमध्ये दोन कैदामध्ये प्रचंड हाणामारी झाली. त्यात मध्यस्थी करणाऱ्या कारागृह अधिकाऱ्यावर एका कैद्याने प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात राकेश चव्हाण हे जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. राकेश चव्हाण यांच्या तक्रारीनंतर अफान सैफीउदीन खान नावाच्या आरोपी कैदीविरुद्ध एन. एम. जोशी मार्ग पोलिसांनी गंभीर दुखापतीसह सरकारी कामात अडथळा आणणे तसेच अन्य कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. याच गुन्ह्यांत त्याला लवकरच अटक केली जाणार आहे. अफान खान हा एका गुन्ह्यांत सध्या आर्थर रोड जेलमध्ये न्यायलयीन कोठडीत आहे.

## डोंबिवलीत साप चावल्याने 4 वर्षांच्या मुलीचा मृत्यू, रुग्णालयात उपचारासह सोयींचा अभाव, कुटुंबाचा आरोप

■ युवा सुत्र

ठाणे : ४ वर्षाच्या मुलीला साप चावला. परंतु ती बोलू शकली नाही की तिच्या सोबत नेमके काय झाले आहे? जेव्हा त्या मुलीच्या मावशीला सापाने चावा घेतला, तेव्हा घरच्याना कळले की, ४ वर्षाच्या प्राणवी हिच्यासोबत काय घडले आहे. मुलीला आणि मावशीला केडीएमसी शास्त्रीनगर रुग्णालयात दाखल केले. आधी डॉक्टरांनी सांगितले आत्ता तब्येत व्यवस्थित आहे. मात्र मुलीची तब्येत खालावली. तिला दुसऱ्या रुग्णालयात हलविण्यापूर्वीच शास्त्रीनगरच्या प्रवेश द्वारावरच तिने प्राण सोडला. साप चावल्यावर केडीएमसीच्या रुग्णालयात योग्य उपचार मिळत नाहीत. तसेच पर्यायी व्यवस्था उपलब्ध नसल्याने मुलीचा मृत्यू झाला आहे, असा गंभीर आरोप तिच्या पालकांनी केली आहे. डोंबिवलीतील आजदे गावात विक्की भोईर राहतात. ते मंडप डेकोरेशनचे काम करतात. अनेक दिवस झाल्याने त्यांची पत्नी माहेरी गेली नव्हती. त्यामुळे त्यांनी पत्नी आणि मुलीला त्यांच्या माहेरी म्हणजेच खंबाळपाडा येथे पाठविले होते. ४ वर्षांची मुलगी प्राणवी ही सोबत गेली होती. माहेरी गेल्यानंतर रात्रीच्या वेळी प्राणवी तिच्या मावशीजवळ झोपली होती. ती अचानक जोरजोरात रडू लागली. त्या आवाजाने तिच्या मावशीची झोप उडाली. रडत असलेल्या प्राणवीला तीने तिच्या आईकडे दिले. पण प्राणवीचे रडणे थांबतच नव्हते. थोड्याच वेळात सापाने तिच्या मावशीला ही चावले. नंतर लक्षात आले की, प्राणवीला देखील सापानेच चावले असेल. घरच्यांना माहिती मिळताच त्यांनी प्राणवी आणि तीच्या मावशीला केडीएमसीच्या शास्त्रीनगर रुग्णालयात उपचारासाठी नेले. डॉक्टरांनी सांगितले की, दोघी व्यवस्थीत आहेत. परंतू एक तासाच्या उपचारा दरम्यान प्राणवीची तब्येत आणखी बिघडली. तिला दुसऱ्या रुग्णालयात हलवण्याचा निर्णय कुटुंबीयांनी घेतला. पण तिला हलविण्यापूर्वीच शास्त्रीनगर रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावरच तिचा मृत्यू झाला. तिच्या मावशीवर एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. मुलीच्या मृत्यूनंतर पालकांसह नागरीकांनी केडीएमसी रुग्णालयात योग्य उपचार मिळत नसल्याचा आरोप केला आहे. मुलीला पुढील उपचारासाठी वेळीच दुसऱ्या रुग्णालयात हलविले असते तर तिचा मृत्यू झाला नसता. एका गोड मुलीचा अशा प्रकारे मृत्यून झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



## महाराष्ट्र हादरला! चिकन खाण्यासाठी मुलाचा हट्ट, आईने थेट जीवच घेतला

■ युवा सुत्र

पालघर : आईचे प्रेम हे सर्वाधिक पवित्र आणि अनंत सागराप्रमाणे मानले जाते. आईच्या प्रेमाची तुलना कशाशीच होऊ शकत नाही असे म्हटले जाते. आपल्यो पोटच्या गोळ्याचे आयुष्य सुंदर व्हावे यासाठी आई तिच्या आयुष्य पणाला लावते. आपल्या लेकरांसाठी जीव देण्यासाठी तयार असणाऱ्या कित्येक मातांची उदाहरणे तुम्ही पाहिली असतील. पण सध्या मात्र एक अजब आणि धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणामुळे सगळेच सुन्न झाले आहेत. पालघर जिल्ह्यातील धनसार काशीपाडा येथे ही दुर्दैवी घटना घडली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार एका महिलेने आपल्या दोन पोटच्या मुलांना बेदम मारहाण केली आहे. या मारहाणीत एका सात वर्षीय चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर दुसरी दहा वर्षांची मुलगी गंभीर जखमी आहे. या मारहाणीत सात वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. तर दहा वर्षांची मुलगी गंभीर जखमी झाली असून तिच्यावर सध्या उपचार करण्यात येत आहे. या प्रकरणातील आरोपी आई पल्लवी धोमडे हिला पालघर पोलिसांनी अटक केली आहे. पोलीस या प्रकरणात पुढील कारवाई करत आहेत. ही दोन चिमुरडी मुलं खाण्यासाठी चिकन मागत असल्याचे समोर आले आहे. चिकन खाण्यासाठी हट्ट करत असल्यामुळे आरोपी महिलेला राग अनावर झाला. याच रागात तिने आपल्या सात वर्षीय मुलाला आणि दहा वर्षीय मुलीला बेदम राहणा केली.

### मालकाचे 45 लाख रुपये घेऊन चालक, नोकर फरार; बिहारमधून दोघांना अटक

■ युवा सुत्र

मुंबईः मोटारगाडीत ठेवलेली मालकाची ४५ लाख रुपयांची रोकड चालक आणि नोकराने पळवल्याची घटना आठ दिवसांपूर्वी चेंबूर परिसरात घडली. या प्रकरणी गोवंडी पोलिसांनी बिहारमधून दोन्ही आरोपींना अटक केली असून पोलिसांनी त्यांच्याकडून ३६ लाख रुपये हस्तगत केले. वडाळा परिसरात वास्तव्यास असलेले तेजप्रकाश डांगी (५८) १९ सप्टेंबर रोजी मित्रांने दिलेले कामाचे ४५ लाख रुपये घरी घेऊन जात होते. मात्र त्यांची सून चेंबूरमधील एका खासगी रुग्णालयात दाखल असल्याने ते तिला पाहण्यासाठी रुग्णालयात गेले होते. पैशांची बॅग गाडीत ठेऊन ते रुग्णालयात गेले होते. त्यावेळी गाडीत चालक नितेशकुमार महंतो होता. मात्र काही वेळानंतर पैशांची बॅग गाडीत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी चालकाला फोन केला. मात्र त्याचा फोन बंद होता. संशय आल्याने त्यांनी तत्काळ नितेशकुमारचा भाऊ राहुलकुमार महंतोला फोन केला. तो त्यांच्याच कार्यालयात काम करत होता. मात्र त्याचाही फोन बंद होता. दोघांचे फोन बंद असल्याने डांगी यांनी तत्काळ मोटारगाडीकडे धाव घेतली. मात्र चालक तेथेच गाडी सोडून पळून गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. गाडीतील पैशांची बॅग गायब झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. डांगी यांनी तत्काळ गोवंडी पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि घडला प्रकार पोलिसांना सांगितली. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. दोन्ही आरोपी मूळचे बिहारमधील एका खेड्यातील रहिवासी होते. त्यामुळे पोलिसांनी एक विशेष पथक तयार करून आरोपींचा शोध सुरू केला. सलग सहा दिवस शोध मोहीम राबवून पोलिसांनी आरोपींना समस्तीपूर जिल्ह्यातील एका गावातून अटक केली. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून ३६ लाख रुपये हस्तगत केले असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### बोगस कॉल सेंटर प्रकरण : माजी महापौरांसह इतरांना पाच दिवसांची पोलीस कोठडी

■ युवा सुत्र

जळगाव : जळगाव तालुक्यातील मुमराबाद शिवारातील माजी महापौर ललित कोल्हे यांच्या मालकीच्या एल.के. फॉर्म येथे बोगस कॉल सेंटरच्या नावाखाली परदेशातील लोकांना फोन करून आर्थिक फसवणूक करणाऱ्या प्रकरणाचा पर्दाफाश केला आहे. रविवारी २८ सप्टेंबर रोजी दुपारी बारा वाजता छापा टाकला आहे. या प्रकरणात अटक केलेल्या सात जणांना सोमवारी २९ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. यासंदर्भात अधिक माहिती अशी की, जळगाव तालुक्यातील ममुराबाद शिवारातील एल के फार्म हाऊस येथे बोगस कॉल सेंटर सुरू असून या कॉल सेंटरच्या माध्यमातून यु एस आणि कॅनडा येथील नागरिकांना फोन करून ॲमेझॉन कस्टमर केअर असल्याचे सांगून अनेकांची लाखो रुपयांमध्ये फसवणूक करत होते. याची गोपनीय माहिती आपण पोलिस अधीक्षक अशोक नखाते यांना मिळाले होती. त्यानुसार त्यांनी पथकाला तयार करून स्वतः पथकासह रविवारी २८ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता एल.के. फार्म हाऊस येथे छापा टाकला. या ठिकाणी पोलिसांनी काही जणांना ताब्यात घेऊन चौकशीला सुरवात करण्यात आली. यामध्ये देशी विदेशी लोकांशी संपर्क साधून त्यांची आर्थिक फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांनी माजी महापौर ललित कोल्हे यांच्यासह तेथे काम करणाऱ्या इतर सहा जणांना ताब्यात घेतले.

# राहुल गांधींना जीवे मारण्याची धमकी:काँग्रेसने शहांना लिहिले पत्र; विजय वडेट्टीवार म्हणाले- लोकशाही संपुष्टात आणण्यासाठीचे वक्तव्य

■ युवा सुत्र

नवी दिल्ली : काँग्रेसचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल यांनी २८ सप्टेंबर रोजी गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून एका टीव्ही चर्चेदरम्यान राहुल गांधींना दिलेल्या जीवे मारण्याची धमकी मिळाल्याचा उल्लेख केला होता. पत्रात म्हटले आहे की, भाजप प्रवक्त्यांविरुद्ध त्वरित कारवाई न करणे हे राहुल गांधींवरील हिंसाचारात सहभागी असल्याचे मानले जाईल.

वेणुगोपाल यांनी अमित शहा यांना लिहिले की, 'ही धमकी एका छोट्या पदाधिकाऱ्याची निष्काळजीपणे दिलेली प्रतिक्रिया नाही. हे जाणूनबुजून निर्माण केलेल्या द्वेषाच्या विषारी वातावरणाचा परिणाम आहे, ज्यामुळे विरोधी पक्षनेते असुरक्षित होतात. आता तुमचा पक्ष आणि सरकार कोणत्या विचारसरणीला पाठिंबा देते हे स्पष्ट करण्याची जबाबदारी तुमची आहे.'

खरंतर, केरळमधील एका वृत्तवाहिनीवर लडाख हिंसाचारावर लाईव्ह चर्चा सुरू होती. यादरम्यान, भाजपच्या वतीने बोलताना माजी एबीव्हीपी नेते प्रिंटू महादेव म्हणाले की, राहुल गांधींच्या छातीत गोळी मारली जाईल.



“ हिंसाचाराला चिथावणी देण्याच्या निर्लज्ज कृत्यात, महादेवने उघडपणे जाहीर केले की राहुल गांधींच्या छातीत गोळी मारली जाईल. हे बोलणे चुकीचे नाही किंवा निष्काळजीपणे अतिशयोक्ती नाही. ही विरोधी पक्षाच्या नेत्या आणि भारतातील आघाडीच्या राजकारण्यांपैकी एकाला सुनियोजित आणि भयानक जीवे मारण्याची धमकी आहे.

केसी वेणुगोपाल,
काँग्रेस सरचिटणीस

### वेणुगोपाल यांच्या पत्रातील आरोप

■ भारतातील सार्वजनिक जीवन विषारी बनवणाऱ्या गुन्हेगारी धमक्या, जीवे मारण्याच्या धमक्या आणि हिंसाचाराच्या राजकारणाचे तुम्ही उघडपणे समर्थन करता का?

■ कुटुंबातील दोन सदस्यांना हत्याकांडात गमावलेल्या नेत्याच्या सुरक्षेसारख्या संवेदनशील मुद्द्याचे राजकारण करून हे सरकार आगीशी खेळत आहे.

■ जर कोणतीही कारवाई केली गेली नाही, तर विरोधी पक्षाच्या नेत्याविरुद्ध हिंसाचाराला कायदेशीर आणि सामान्य करण्याचा परवाना देणे हे केंद्रीय गृहमंत्री म्हणून तुमच्या शपथेचे गंभीर उल्लंघन ठरेल.

### काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांची प्रतिक्रिया

विजय वडेट्टीवार म्हणाले की, नथुराम गोडसेची औलाद बनून राहुलजी गांधी यांना गोळ्या घालण्याचे भाजप नेत्याने दिलेले वक्तव्य हे देशातील लोकशाही संपुष्टात आणण्यासाठी केलेलं वक्तव्य आहे. एक व्यक्ती लोकशाही वाचवण्यासाठी गरीब, मजूर, शेतकरी यांचा आवाज बनून संघर्ष करतोय. दलित, ओबीसी, आदिवासी यांच्यासाठी लढणाऱ्या नेत्याला गोळ्या घालण्याची भाषा भाजप करत आहे, हा पोरखेळ आहे का? या व्यक्तीवर कारवाई केली पाहिजे. नाहीतर ही सरकारची अधिकृत भूमिका आहे का असा सवाल उपस्थित होतो.

# देशातील 90 टक्के विद्यार्थी व्यावसायिक शिक्षणापासून वंचित

■ युवा सुत्र

नवी दिल्ली : देशातील ९० टक्के विद्यार्थी व्यावसायिक शिक्षणापासून वंचित असल्याचे वास्तव नुकतेच समोर आले आहे. करिअर काय करायचे? हा प्रश्न दहावी-बारावीच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या बहुतांश विद्यार्थ्यांना भेडसावतो. मात्र, उत्तर शोधायला आवश्यक ते व्यावसायिक मार्गदर्शनच जवळपास ९० टक्के भारतीय विद्यार्थ्यांना मिळत नाही, अशी धक्कादायक बाब संयुक्त राष्ट्र प्रायोजित एका अभ्यासातून पुढे आली आहे. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, ओडिशा, गुजरात, पंजाब, कर्नाटक व राजस्थान या सात राज्यांतील १४ जिल्ह्यांमधील तब्बल २१,२३९ विद्यार्थ्यांचा अभ्यास करून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. शालेय पातळीवरही ही दरी स्पष्ट दिसते. संसाधने चांगली असूनही खासगी ४१ टक्के, तर सरकारी शाळांतील ३५ टक्के विद्यार्थी अभ्यासक्रमाच्या निवडीबाबत गोंधळलेले आहेत. 'बॅकअप' करिअर प्लॅन तयार करणारे विद्यार्थी २२ टक्के आहेत. या अडचणींमध्ये मर्यादित माहिती, आत्मजागरूकतेचा अभाव, नातलग, मित्रांचा दबाव, आर्थिक नियोजनाची गफलत याचा समावेश आहे.

# तिरुपती मंदिर ठरले देशाचे पहिले एआय टेंपल



■ युवा सुत्र

चेन्नई : आंध्र प्रदेशमधील जगप्रसिद्ध तिरुमला तिरुपति मंदिर लवकरच एका महत्त्वपूर्ण बदलासाठी सज्ज झाले आहे. मंदिरात लवकरच आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञानाने युक्त असलेले कमांड कंट्रोल सेंटर सुरू केले जाणार आहे. या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने मंदिरातील भाविकांची गर्दी नियंत्रित करणे अधिक सोपे आणि प्रभावी होईल. तिरुपति मंदिर हे भारतातील कोणत्याही मंदिरात अशा प्रकारचे एआय-सज्ज कमांड कंट्रोल सेंटर सुरू करणारे पहिले मंदिर ठरणार आहे. याच कारणामुळे या मंदिराला भारताचे पहिले एआय टेंपल असे म्हटले जात आहे. हे नवीन तंत्रज्ञान आणि अक वापरून मंदिरात येणा-या भाविकांच्या गर्दीचे आकलन केले जाईल. दर्शनासाठी रांगेत किती भक्त आहेत, याचा अंदाज घेता येईल.

### एआय कंट्रोल सेंटरची वैशिष्ट्ये

**वैकुंठम-१ :** कॉम्प्लेक्समध्ये हे इंटीग्रेटेड कमांड कंट्रोल सेंटर तयार करण्यात आले आहे. इथे एका मोठ्या डिजिटल स्क्रीनवर मंदिराच्या परिसरातील सर्व सीसीटीव्ही कॅमे-यांचं लाइव्ह फुटेज पाहता येणार आहे.

**चेहरा ओळखण्याची क्षमता :** या सिस्टीममधील अक-सज्ज कॅमे-यांमध्ये चेहरा ओळखण्याची क्षमता आहे.


**वेळेचा अचूक अंदाज :** हे कॅमेरे रांगेत उभ्या असलेल्या भाविकांची संख्या सहजपणे मोजू शकतात आणि दर्शनासाठी किती वेळ लागेल याचा अचूक अंदाज देऊ शकतात. यामुळे अधिका-यांसाठी गर्दीचे नियंत्रण करणे सोपे होईल.

# 'एक्स' कर्नाटक हायकोर्टाचा आदेशाला आव्हान देणार

■ युवा सुत्र

बंगळुरू : एलॉन मस्क यांची कंपनी आणि सोशल मीडिया प्लेटफॉर्म एक्स (पूर्वीचे ट्विटर) ने कर्नाटक उच्च न्यायालयाच्या अलिकडच्या आदेशावर तीव्र चिंता व्यक्त केली आहे. एका पोस्टमध्ये एक्सने लिहिले आहे की हा आदेश पोलिस अधिका-यांना गुप्त ऑनलाइन पोर्टलद्वारे मनमानीपणे सामग्री काढून टाकण्याचे आदेश जारी करण्यास सक्षम करतो.

कंपनीने म्हटले आहे की या नवीन तरतुदीला कोणताही कायदेशीर आधार नाही आणि तो आयटी कायद्याच्या कलम ६९अ नुसार नाही. हा




आदेश सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांच्या विरुद्ध आहे आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यासह भारतीयांच्या संवैधानिक अधिकारांचे उल्लंघन करतो. मस्क यांच्या कंपनीने कर्नाटक उच्च न्यायालयाच्या या आदेशाविरुद्ध अपील करणार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी लढा देणार असल्याचे स्पष्ट केले आहे. २४ सप्टेंबर रोजी, कर्नाटक उच्च न्यायालयाने केंद्र सरकारविरुद्ध एक्सची याचिका फेटाळून लावली, ज्यामध्ये असे म्हटले होते की परदेशी कंपन्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार दावा करू शकत नाहीत.

मार्च २०२५ मध्ये ने भारत सरकारविरुद्ध याचिका दाखल केली, ज्यामध्ये असा आरोप करण्यात आला होता की भारतीय सरकारी अधिकारी वरील कंटेंट ब्लॉक करत आहेत, जे आयटी कायद्याच्या कलम ७९(३)(इ) चा गैरवापर आहे.

# माओवाद्यांची शस्त्रसंधी अमान्य: गृहमंत्री अमित शहा

■ युवा सुत्र

नवी दिल्ली : केंद्र सरकारच्या सशस्त्र कारवाईमुळे कणा मोडलेल्या माओवाद्यांच्या प्रमुख संघटनेने दिलेला शस्त्रसंधीचा प्रस्ताव केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी स्पष्ट शब्दांत फेटाळला आहे. 'शस्त्रे टाका आणि शरण या', असा संदेश शहा यांनी रविवारी दिला होता दरम्यान माओवाद्यांच्या संदेशाला गृहमंत्र्यांनी केराची टोपली दाखविली आहे. 'नक्षलमुक्त भारत' या व्याख्यानामध्ये शहा यांनी केंद्र सरकारची भूमिका स्पष्ट केली. 'मध्यंतरी माओवादी संघटनेने भ्रम निर्माण करण्यासाठी एक पत्रक काढून शस्त्रसंधी जाहीर करण्याची मागणी केली व शरणागतीची इच्छा प्रदर्शित केली. सरकारची याबाबतची भूमिका स्पष्ट आहे. कोणत्याही स्थितीत माओवाद्यांशी शस्त्रसंधी होणार नाही. शरणागतीसाठी त्याची आवश्यकताही नाही. तुम्ही शस्त्रे खाली ठेवा आणि शरण या. तुमच्यावर एकही गोळी झाडली जाणार नाही अशी ग्वाही शहा यांनी दिली. माओवादी भारतीय कम्युनिस्ट पक्ष या संघटनेने अलीकडेच पत्रकाद्वारे शस्त्रसंधीचे आवाहन केले होते. शहा यांनी याप्रसंगी डाव्या पक्षांनाही लक्ष्य केले. 'डाव्या पक्षांनीच डाव्या अतिरेकी विचारांना वैचारिक बळ दिले. समाजात वावरणा-या लोकांनीच या विचारांचे समर्थन केले. माओवादी हिंसाचार हा अपु-या विकासाशी संबंधित नाही. याउलट रक्तरंजित दहशतवादामुळेच देशातील अनेक भागांमध्ये काही दशकांपासून विकास पोहोचला नाही', अशी भूमिकाही शहा यांनी मांडली. का हा प्रश्न वाढला आणि फोफावला? त्यांना कुणी वैचारिक सा दिले? जोपर्यंत समाजातूनच माओवादाला मिळणारे वैचारिक समर्थन, कायदेशीर सा आणि आर्थिक मदत रोखली जात नाही, तोपर्यंत माओवाद संपुष्टात येणार नाही असेही शहा यांनी स्पष्ट केले.

# आसाममध्ये 6 आदिवासी समुदाय रस्त्यावर उतरले

■ युवा सुत्र

दिसपूर : आसाममध्ये सध्या प्रसिद्ध गायक झुबीन गर्ग यांच्या निधनाने शोककळा पसरली आहे. प्रत्येक घर दुःखात बुडालेले असताना सरकारला एका नवीन आव्हानाचा ताण जाणवत आहे. हा तणाव सहा आदिवासी समुदायांमुळे निर्माण झाला आहे. गेल्या १० दिवसांपासून आसाममधील मटक समुदाय रस्तावर उतरला आहे. मटक समुदायाने दोन मोठ्या रॅली काढल्या आहेत. प्रत्येक वेळी, ३०,००० ते ४०,००० आदिवासी लोक हातात मशाली घेऊन रस्त्यावर उतरले. ही रॅली दिब्रुगडमध्ये झाली होती, परंतु त्याचा परिणाम गुवाहाटीसह संपूर्ण राज्यात जाणवला. हा समुदाय स्वतःसाठी अनुसूचित जमातीचा दर्जा आणि स्वतःचे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि प्रशासकीय निर्णय घेण्याचा अधिकार मागत आहे. मटक समुदाय रस्त्यावर उतरणारा एकमेव नाही, तर राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे १२% असलेल्या इतर पाच जमातीदेखील रस्त्यावर उतरल्या आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकः युवराज डी. सुर्वे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्रमांक W 230 येथे, टीटीसी औद्योगिक क्षेत्र, खैरणे एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - 400710, जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र येथे छापून: रुम नं.6, चाळ नं.1, ओम सद्गुरु कृपा को. ऑ. सोसा. नांदिवली रोड, गावदेवी मंदिराजवळ, नांदिवली गाव, डोंबिवली (पू.) कल्याण जि.ठाणे 411201 येथुन प्रकाशित केले. (या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद कल्याण न्यायकक्षेत)
संपादक: युवराज डी. सुर्वे Email Id: yuvasutra1@gmail.com Web: www.yuvasutra.com RNI No.: MAHMAR/2023/84104 MO: 7738870100